दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● रविवार २८एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २५५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# स्वातंत्र्य काळापासून कोरडेवाडी पाण्यावाचून कोरडीच .! संतप्त ग्रामस्थांचा लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार !

## कोरडेवाडी येथील तलावाच्या फक्त घोषणा प्रत्यक्षात अंमलबजावणी मात्र शुन्य लोकप्रतिधीचां कर्तृत्व शुन्य विकास

**वादळवार्ता/केज**

तालुक्यातील कोरडेवाडी येथील अतिशय महत्वाकांक्षी असा समजला जाणारा साठवण तलावाचा प्रश्न २५ वर्षापासून प्रलंबित आहे. याकडे लोकप्रतीनिधी तसेच प्रशासनाचे याकडे वर्षानुवर्ष दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. मात्र नावाप्रमाणेच बारामही कोरडीच राहणारी ही 'कोरडे'वाडी स्वातंत्र्य काळापासून कोरडीच राहिली आहे. याकडे कोणत्याच नेत्याचे लक्ष नाही. आज उद्या आपल्या गावाची तहान भागेल या आशेवर कोरडेवाडी ग्रामस्थ प्रतीक्षा करीत आहेत. मात्र हा तलावाचा प्रश्न सुटता सुटेना ही लाजिरवाणी बाब आहे. जवळच काही अंतरावर असलेल्या सोंन्नाखोटा अशा मोठ मोठ्या तलावाचा सर्व होऊन काम पूर्ण झाले आहे. मात्र लोकप्रतिनिधी तसेच प्रशासनाची याकडे डोळेझाक झाल्याची घटना वारंवार होताना दिसत आहे. कोरडेवाडी हे गाव अतिशय दुर्गम भागात असल्याने त्या ठिकाणी पाण्याचे स्त्रोत उपलब्ध नाहीत सर्व ऋतू मध्ये ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण करावी लागत . तसेच शेतीसाठी पाणी नसल्याने गावकरी मोठ्या संख्येने स्थलांतरित होतात. म्हणून याची दखल आतातरी घ्यावी म्हणून कोरडेवाडी गावच्या सरपंच सौ. नंदुबाई रमेश कोरडे यांच्यासह सदस्य व ग्रामस्थांनी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचे निवेदन तहसील केज तहसीलदाराकडे सादर केले आहे. याच्या प्रतीलीपी जिल्हाधिकारी बीड, उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई, पोलिस अधीक्षक बीड, पोलिस निरीक्षक केज यांना देण्यात आल्या आहेत. आमचा प्रश्न सोडवण्यासाठी आतापर्यंत लोकप्रतिनिधी व प्रशासनाने उदासीनता दाखवले आहे. त्यामुळे आम्हीही आता येणाऱ्या लोकसभा मतदानाकडे पाठ फिरवू अशा प्रकारच्या प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत. कोरडेवाडी येथील मतदान दोन हजाराच्या वर आहे.



या गावातील साठवण तलावाचा कामाचा सर्वे होऊन तब्बल २५ वर्षे लोटले आहेत. तरीसुद्धा प्रतिनिधी तसेच प्रशासनाला जाग आली नाही. या लोकसभेच्या निवडणुकीत निवडणुकीवर बहिष्कार घालणे आमच्यासाठी दुर्दैवाची बाब असल्याची खंत माजी सरपंच सतीश दुनघव यांनी केली आहे. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केज शहरात घराघरात वाजणार तुतारी ; शहरातील कार्यकर्त्यांनी बैठकीत केला निर्धार...

वादळवार्ता/केजलोकसभेच्या निवडणुकीचे वारे सध्या गाव गाड्यापासून शहरापर्यंत जोरात वाहु लागले आहे. जिथे तिथे चर्चेला उधान आले आहे.



बैठका , रॅली गावभेटीचा झंझावात सुरू झाला आहे. त्यातच बीड लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांचे केज शहरातील कार्यकर्त्यांनी पवनसुत निवासस्थांनी शहरातील बैठकीचे आयोजन सायं ७ वाजता केले होते. यामध्ये महाविकास आघाडीचे शहरातील पदाधिकारी मोठ्या संख्येने एकत्र येत बजरंग सोनवणे यांचा प्रचार करण्याचा तसेच घराघरात विजयाची तुतारी वाजवण्याचा निर्धार केला आहे. या बरोबरच बैठकीमध्ये महाविकास आघाडीच्या पदाधिकारी तथा कार्यकर्त्यांनी सुचना देऊन मनोगत व्यक्त केली . सदरील बैठकीचे सुत्रसंचालन शदो खतीब यांनी केले तर आभार सय्यद शरीफ यांनी मानले.

## आज तांदळवाडी येथे ह भ प महामंडलेश्वर अमृत महाराज जोशी यांचे किर्तन

**वादळवार्ता/शिरूर कासार**

प्रात:स्मरणीय संत वामनभाऊ महाराज यांनी प्रारंभ केलेल्या श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचा फिरता नारळी सप्ताहाचे हे ९२ वर्ष बीड जिल्ह्यातील तांदळवाडी भिल्ल येथे संपन्न होत असून आज दिनांक २८ एप्रिल रोजी रात्री आठ ते दहा ह भ प महामंडलेश्वर अमृत महाराज जोशी बीउ यांचे जाहीर हरी किर्तन होणार असून या कीर्तनाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन तांदळवाडी भिल्ल जि बीड यांनी केले आहे



सकाळी काकडा भजन गाथा गाथा भजन प्रवचन हरिपाठ श्रीमद् भागवत कथा व रात्री आठ ते दहा जाहीर हरी कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे

दुपारी दोन ते पाच अनंत विद्या विभूषित श्री १००८ उत्तम स्वामीजी महाराज यांच्या मुखर्विंधातून श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे हरिपाठ होऊन रात्री आठ ते दहा ह भ प महामंलेश्वर अमृत महाराज जोशी बीउ यांचे कीर्तन होणार आहे व त्यानंतर जागर होऊन या सर्व कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री क्षेत्र गहिनीनाथ संस्थांचे मठाधिपती ह भ प गुरुवर्य विठ्ठल महाराज व सर्व ग्रामस्थ तांदळवाडी भिल्ल जिल्हा बीड यांनी केले आहे

# पाटोदा येथील बजाज सर्व्हस सेंटरला आग जवळपास पंधरा लाखाचे नुकसान

**वादळवार्ता/पाटोदा**

पाटोदा येथील बजाज ऑटो सर्विस मोटरसायकलच्या दुकानात शाट सर्किटमुळे आग लागून जवळपास पंधरा लाखाची नुकसान झाले आहे पाटोदा शहरात मांजरसुंबा रोड वर मुस्ताफा लालाखाँ पठाण यांचे न्यु भारत ऑटो बजाज नावाचे बजाज कंपनीचे अधिकृत सर्व्हिस सेटर आहे. गुरुवार रात्री ११ वाजेच्या सुमारास या दुकानास शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. या आगीत ५ पल्सर मोटार सायकली व ईतर साहीत्य जळुन गेल्याने जवळपास पंधरा लक्ष रुपयाचे नुकसान झाले आहे दुकान बंद केल्यानंतर गुरुवारी रात्री ११ वा दुकानातून धूर येत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे दूकाना शेजारील चहावाला महेश छगन राऊत यांनी याची माहिती तात्काळ दुकान मालक मुस्तफा यांना दिली याचवेळी अग्निशमन गाडीचा ही पाचारण करण्यात आले तात्काळ अग्नीशमन गाडी आली व आग विझवण्यात आली परतु आग विझवण्या पूर्वीच . १२ पल्सर गाडया पैकी ५ पल्सर गाड्या जळाल्याने ज्याची किंमत ७,५०,००० रु. नुकसान झाले आहे तसेच दुकानाचे फर्निचर किंअ-३, ३०,००० रु रु. सर्व्हिस सेटर मधील स्पेअर पार्ट ज्याची किंमत १, ५५ ०००, व दुकानातील इतर महत्वाचे कागदपत्रे असे एकूण जवळपास पंधरा लक्ष रुपया पर्यंतचे नुकसान आगीच्या घटनेमध्ये झालेले आहे.



संपादकीय

## गाडी सावकाश चालवू: गावी सुखरूप पोहचू!

(ओव्हर टेक विशेष.)

कारण "हम भी किसीसे कम नही!" हाच त्याचा स्वाभिमानी हेका असतो, तोरा असतो. परंतु त्याला हे कळत नाही, कि जाऊ दे बिचाऱ्याला! तो अंत्यत तातडीच्या कामात असेल. त्या ओव्हर टेकरची गाडी अधिक बलशाही व नवीन, कोरी करकरीत असेल. जाऊया आपण आपल्या नित्य चालीने. ओव्हर टेकरला मात्र ही सवय नित्याचीच होऊन जडलेली असते. कुठल्याच कामात तो मागे राहू इच्छित नाही. यातून त्यास खुप मोठा आनंद मिळत असावा, मात्र तो क्षणिक आणि आसुरी आनंद असतो. तो शाश्वत आनंद, ब्रह्मानंद मुळीच नसतो, हे मात्र नक्की! असेही त्याला वाटते, की आपण फार मोठे पराक्रमी वीर आहोत, म्हणून "सदैव सैनिका पुढेच जायचे!" या तोऱ्यात तो मिरवत फिरतो. ही मार्गदर्शक जाणिव जागृती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दातून जरूर वाचा... संपादक.

आज प्रत्येकाच्या मुखातून हे शब्द बाहेर पडताना दिसतात, की सद्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. म्हणूनच की काय? आजचा युवकवर्ग पुढच्यास ओलांडून त्याच्या कितीतरी पुढे निघून जाण्याच्या नादात- ओव्हर टेक करण्याच्या प्रयत्नात सदासर्वकाळ दिसून येतो. यातच तो आनंद मानतो, हेच आपले ध्येय समजतो. मग तो जीवनमार्ग असू द्या किंवा वर्दळीचा राष्ट्रीयमार्ग तथा आंतरराष्ट्रीय महामार्ग असू द्या. आपलाच एक बांधव आहे, आपल्यासारखाच एक मानव आहे, अशी कदाचित त्याला कल्पना किंवा बुद्धीच उमगत नसावी. असे ते ओव्हर टेकचे भयान नाट्य बघून वाटते. बरं, एकाने ओव्हर टेक केले, म्हणून दुसरा तरी शांत व आपल्या चालीने- वेगाने मार्गक्रमण असतो का? नाही. त्याला पण चेव येतो, त्याची तीव्रपणे चेतना जागृत होते. मग तो चिडून त्वेषाने इरेस पेटतो आणि आपणही त्याला मागे पाडावे, म्हणून तो गाडी अतिवेगान दामटू लागतो. कारण "हम भी किसीसे कम नही!" हाच त्याचा स्वाभिमानी हेका असतो, तोरा असतो. परंतु त्याला हे कळत नाही, कि जाऊ दे बिचाऱ्याला! तो अंत्यत तातडीच्या कामात असेल. त्या ओव्हर टेकरची गाडी अधिक बलशाही व नवीन, कोरी करकरीत असेल. जाऊया आपण आपल्या नित्य चालीने. ओव्हर टेकरला मात्र ही सवय नित्याचीच होऊन जडलेली असते. कुठल्याच कामात तो मागे राहू इच्छित नाही. यातून त्यास खुप मोठा आनंद मिळत असावा, मात्र तो क्षणिक आणि आसुरी आनंद असतो. तो शाश्वत आनंद, ब्रह्मानंद मुळीच नसतो, हे मात्र नक्की! असेही त्याला वाटते, की आपण फार मोठे पराक्रमी वीर आहोत, म्हणून "सदैव सैनिका पुढेच जायचे!" या तोऱ्यात तो मिरवत फिरतो. किंवा नुसतीच त्याला मिरवायचे असते की आपण किती कार्यतत्पर आहोत. आपली कामाची उरक लोकांच्या डोळ्यांत त्वरेने भरण्याची घाई त्याला झालेली असते. जशी आपल्याकडे झाडीबोलीतील एक म्हण प्रसिद्ध आहे तशी-

"येलपाडीचे (मिजासखोर स्त्रीचे) आले डोळे|
खाटले ठेवून खाल्या लोळे||"

ज्ञानवंतांनी भुकेल्या, तहानलेल्या, अधाशी, हपापलेल्या व्यक्तीस पुढ्यात घेऊन त्याची इच्छा पूर्ण केली पाहिजे. त्याच्यासारखेच ज्ञानवंतही करू लागले तर त्यांच्यातील फरकच कळणार नाही. म्हणून ज्ञानवंतांनी संयम, सबुरी व धीरानेच अशा प्रसंगाना सामोरे जाणे इष्ट ठरते. एकदा एका बाइकस्वाराने ओव्हर टेक केला. तेव्हा मागे पडलेला बाइकस्वार त्वेषाने पेटून उठला व बाइक वेगात दामटली. अतिवेगामुळे वळणावर ती घसरली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या दगडावर जोरात आपटली. तिचा चेंदामेंदा झाला, तर बाइकस्वाराने मात्र या जगाचा कायमचा निरोप घेतला. दुसरी एक घटना अशी, की चार चाकी कारला एका बाइकस्वार युवकाने ओव्हर टेक करून मागे टाकले आणि तो शहरातील मुख्य चौकात येऊन काहीतरी खरेदी करू लागला. तेवढ्यात ती कार येऊन पोहोचली. कारचालक युवती त्याला आडवी झाली. "मला ओव्हर टेक करण्याची तुझी हिंमतच कशी झाली?" म्हणत आधी त्याच्या गालांगालावर मोजले आणि मग त्याला चांगलेच बदडून काढले. असा आपल्याला ओव्हर टेक केल्याचा वचपा, बदला घेतला. किती मोठ्ठा आनंद, परमानंद झाला असेल तिला! नाही काहो?

# आंतरराष्ट्रीय नृत्य दिनाचे उद्दिष्ट!

[विश्व नृत्य दिन विशेष.]

नृत्य हे मानवाच्या अभिव्यक्तीचा अविष्कार आहे. आपल्या शरीराच्या माध्यमातून विविध भावना व्यक्त करण्याचं ते एक माध्यम आहे. मनुष्याच्या आयुष्यात असलेल्या या नृत्याचे महत्व जगाला पटवून देण्यासाठी दरवर्षी २९ एप्रिलला आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस साजरा केला जातोय. जगभरात महान नृत्यांगना जीन-जॉर्जेस नवारेच्या वाढदिवसानिमित्त हा उत्सव साजरा करण्यात येत असतो. ज्ञानवर्धक संकलित माहिती श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर लेखातून जाणून घ्या... संपादक.

दरवर्षी २९ एप्रिल हा दिवस आंतरारा्ट्रीय नृत्य दिवस म्हणून साजरा केला जातो. बॅले नृत्याचे आद्य संस्थापक जीन-जॉर्जेस नोवेर यांचा हा जन्मदिवस. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळला जावा असे आंतरराष्ट्रीय नाट्यसंस्था- इंटरनॅशनल थिएटर इन्स्टिट्यूशन- आइटीआइने ठरवले. ही संस्था युनेस्कोची भागीदार असलेली स्वतंत्र संस्था आहे. तिच्या आदेशावरून इ.स.१९८२ सालापासून हा दिवस साजरा करण्यात येत आहे. या दिवशी जगप्रसिद्ध आणि त्या वर्षातील सर्वोत्कृष्ट नृत्य कलावंताला जागतिक संदेश देण्यासाठी आमंत्रित केले जाते. नृत्य कलेला आणि नृत्य कलावंताला जगमान्यता मिळावी, या कलेचा उत्कर्ष आणि अधिकाधिक प्रसार व्हावा आणि तिला राजाश्रय मिळावा हा उद्देश, आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस साजरा करण्यामागे आहे. नृत्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते भावना व्यक्त करण्याचेही एक साधन आहे. मग ती एखाद्याबद्दलची नाराजी असो किंवा एखादी गोष्ट साध्य करण्याचा उत्साह आणि उत्सव असो, तुमच्या प्रत्येक भावना इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी तुम्ही नृत्याची मदत घेऊ शकता. इतकेच नव्हे तर नृत्याच्या माध्यमातून समाजात जनजागृती करण्याचे कामही वर्षानुवर्षे केले जात आहे.

दि.२९ एप्रिल १९८२ रोजी युनेस्कोच्या इंटरनॅशनल थिएटर इन्स्टिट्यूटच्या आंतरराष्ट्रीय नृत्य समितीने महान नृत्यांगना जीन-जॉर्जेस नवेराच्या वाढदिवसानिमित्त हा दिवस साजरा करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासून दरवर्षी हा दिवस जगभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नृत्यांगना नवेरा ही फ्रान्समधील एक निपुण बॅले डान्सर होती, जीने नृत्यावर लेटर्स ऑन दी डान्स नावाचे पुस्तक लिहिले ज्यामध्ये नृत्याशी संबंधित सर्व गोष्टी आहेत. हे वाचून कोणीही नृत्य शिकू शकेल. आंतरराष्ट्रीय नृत्य दिनाचे उद्दिष्ट केवळ जगातील सर्व नर्तकांचे प्रोत्साहन वाढवणे हाच नाही तर या सर्व नृत्य प्रकारांबद्दल लोकांमध्ये जागरुकता पसरवणे हा आहे, ज्यामध्ये जगातील मोठे नेते आणि सरकारे देखील सहभागी आहेत. नृत्य हा स्वतःचा आनंद आहे आणि तो इतरांनाही वाटून घ्यायचा हाही त्याचा उद्देश आहे. पॅरिसमधील इंटरनॅशनल डान्स थिएटर इन्स्टिट्यूट दरवर्षी ऑनलाइन सेलिब्रेशनचे आयोजन करत असते. त्यावेळी आफ्रिका, आशिया, अमेरिका, युरोप आणि अरब देशांतील नृत्यनिर्मितींना आमंत्रित करण्यात येते. या उत्सवाअंतर्गत जगभरातील नृत्यातील वैविध्य आणि सौंदर्य दाखविण्याचा प्रयत्न केला जात असतो.

नृत्य हे केवळ एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याचाच भाग नव्हे तर काही जणांसाठी नृत्य हे स्ट्रेस बस्टर सुद्धा असते. जगात विविध प्रकारच्या संस्कृती आहेत, त्यांच्या नृत्य प्रकारावरून त्या संस्कृतीचा अंदाज बांधता येतो. नृत्य हे मानवाचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. आपल्या शरीराच्या माध्यमातून विविध प्रकारच्या भावनाना वाट करून देण्याच हे एक उत्तम माध्यम आहे. मनुष्य जीवनातील असलेले नृत्याचे महत्व जगाला पटवून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाट्य संस्थाने हा दिवस जगामध्ये साजरा करायला सुरुवात केली. इंटरनॅशनल थिएटर इन्स्टिट्यूशन ही युनेस्कोची कला प्रदर्शनासाठी भागिदार संस्था आहे. जगभरातील अनेक प्रसिद्ध डान्सर्स आणि कोरियोग्राफर्स या संस्थेचे सभासद आहेत. या संस्थेने आधुनिक बेले डान्सचा निर्माता समजले जाणारे जॉर्जेस नोवेर यांना सन्मानित करण्यासाठी दरवर्षी २९ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस म्हणून साजरा करण्याचं ठरवलं आहे. जगभर हा दिवस सर्व देशांच्या राजकीय, सामाजिक आणि भौगोलिक सीमा पार पाडून नृत्य करण्याला प्रोत्साहन देण्यासाठी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नृत्य ही एक जगातील विविध भागांना त्यांच्या नृत्य प्रकाराने जोडणारी एक भाषा आहे. त्यामुळे फक्त नृत्यकलेच्या माध्यमातून एक सकारात्मक किंवा अर्थपूर्ण संदेश देण्याचा प्रयत्न केला जातो. नृत्याचे प्रकार वेगवेगळे आहेत. अगदी लहान लहान प्रदेशापासून वेगवेगळ्या संस्कृतीची वेगवेगळी नृत्य कला असते- १) बेली डान्स या प्रकाराबद्दल माहिती पाहूया. युरोपमधील लेखक आणि चित्रकारांनी या नृत्य करणाऱ्या जिप्सी महिलांची चित्रे काढल्याने हा नृत्यप्रकाराला युरोपभर लोकप्रियता मिळाली. भटक्या लोकांप्रमाणे बेली डान्सर्सचा एक समूह असायचा, आणि ते फिरतीवर असताना नृत्य करायचे. हा बेली डान्स पाठीचा कणा ताठ ठेवून, कंबरेची जलद गतीने हालचाल करून, त्यासोबतच संपूर्ण शरीर एका लयबद्ध ठेक्यामध्ये हलवणे, अशा प्रकारे करण्यात येणारा बेली डान्स मान आणि पाठीच्या आरोग्यासाठी उत्तम आहे. तसेच हृदयाचं स्पंदन होण्यासाठी, आरोग्य उत्तम राखण्यासाठी हा नृत्यप्रकार अनेक कलाकार व्यवस्थित शिकून घेतात. या नृत्याने एका तासात साधारण ३०० ते ५०० कॅलरीज जाळल्या जातात. २) दुसरा प्रकार आहे हिप हॉप. यामध्ये १९७० मध्ये समोर आलेल्या हिप हॉप या नृत्यप्रकारात अपरॉक, ब्रेकिंग आणि फंक स्टाइल्स या प्रकारांचाही समावेश करण्यात येतो. जमैकन- अमेरिकन डीजे कूल हर्क याला हिप हॉप म्युझिकचा संस्थापक असे संबोधले जाते. हिप हॉप प्रकार अत्यंत ऊर्जादायी आहे. जबरदस्त ऊर्जेनेच तो परफॉर्म करावा लागतो. हिप हॉप संगीतासह स्ट्रीट जॅझ बरोबरही तो केला जातो. हा शांत नृत्य प्रकार नाही. काही निवडक शहरांमध्ये शैक्षणिक कार्यशाळा, प्रकल्प, विविध कार्यक्रम, व्याख्याने आयोजित करण्यात येतात. या कार्यक्रमांतर्गत जगभरामधून एक दिग्गज नृत्य कलाकाराची निवड करून त्यांच्या कडून एक सकारात्मक संदेश दिला जातो. प्रत्येक नृत्यप्रेमींसाठी जणू ही एक पर्वणीच ठरते. गेल्या दोन वर्षांत शांघाय आणि हवाना येथे हे सेलिब्रेशन होते आहे. यामध्ये जगभरातील दिग्गज कलाकार, विद्यार्थी आणि नृत्यप्रेमी आवर्जून हजेरी लावतात.

जगभरामध्ये प्रत्येक वर्षी २९ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस म्हणून साजरा केला जातो. दरवर्षी हा नृत्य दिवस मोठ्या उत्साहात जगभरात साजरा केला जातो. पण गेल्या दोनतीन वर्षांपासून सुरू झालेला कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता हा दिवस साजरा करण्यावर अनेक निर्बंध घालून बंधने आणली आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी व्हर्चुअल पद्धतीच्या माध्यमाने हा दिवस साजरा केला जात आहे, हे येथे उल्लेखनीयच! !! विश्व नृत्य दिनाच्या सर्व नृत्यप्रेमी बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**- संकलन व शब्दांकन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली. जि. गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- 9423714883.**

# राज्यस्तरीय ए.टी.एस. परीक्षेत प्रबोधनकार ठाकरे विद्यालय कव्हे शाळेचा निकाल शंभर टक्के

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर /विश्वास चोपडे**

राज्यस्तरीय ए.टी.एस. परीक्षेत प्रबोधनकार ठाकरे विद्यालय कव्हे तालुका माढा शाळेचा निकाल शंभर टक्के लागला असून इयत्ता सातवीतील कु.सायली शरद रुपनवर हिने केंद्रात पहिला क्रमांक मिळवला व तिचा तालुक्यामध्ये ४६ वा क्रमांक आला व राज्यात ५३ वा क्रमांक मिळवला. या यशाबाबत संस्थेचे संस्थापक मा. प्रकाश (आण्णा)गोरे सचिव संजय घाडगे मुख्याध्यापक पांडुरंग यादव यांनी अभिनंदन केले तसेच परीक्षेत बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# भुजबळ व सुभाष राऊत यांची डबल क्रॉसिंग




**दैनिक वादळ वार्ता/ विशेष प्रतिनिधी-** माजलगाव .बीड मध्ये पंकजाताई मुंढे यांना मिळणारी माळी समाजाचा मतांची विभागणी करता येईल आणि त्यातील काही मते बजरंग सोनवणे यांना न मिळता ते मते वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार अशोक हिंगे यांना मिळावे आणि बजरंग सोनवणे यांच्या पथ्यावर पाडण्याची डबल क्रॉसिंग पॉलिटिकल छगन भुजबळ यांच्या जवळचे सुभाष राऊत यांनी घेतला आहे असी प्रतिक्रिया माजलगाव मतदार संघातील राजकीय वर्तुळामध्ये व्यक्त केल्या जात आहेत . लोकसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे आणि महायुतीच्या उमेदवारी पंकजाताई मुंडे यांच्यात लढत होईल असे समजल्यामुळे ना.छगन भुजबळ यांच्या बीड येथील ओबीसी एल्गार महासभेला पंकजाताई ,ना.धनंजय मुंडे उपस्थित राहिले नव्हते त्यामुळे ना.भुजबळ यांच्या इगोला धक्का बसला होता. त्यातच ना.भुजबळ यांना महायुती कडून नाशिक ची उमेदवारी जवळपास निश्चित झाल्याची कुणकुण पंकजाताई मुंडे यांना लागली होती पण हे पंकजा मुंडेंना कदाचीत पचणी न पडल्याने त्यांनी दिल्ली कडे तक्रार केली होती. हा सर्व राजकिय धुरतपणा भुजबळ यांनी ओळखुन बीड जिल्ह्यातील माळी समाजाचे मतदान पंकजाताई मुंडे यांना भेटु नाही त्यामुळे माळी समाजाच्या तरुणांना विरोधात उमेदवारी दाखल करण्याची फुस लावल्याने माळी समाजाच्या जवळपास चार जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. यात विशेष म्हणजे भुजबळ यांचे बीड जिल्ह्यातील समता परीषद चे सुभाष राऊत यांच्या उपस्थितीत त्या उमेदवारां सोबत सविस्तर विचार विनिमय झाल्या नंतरच उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत अशी माहिती त्यांच्याच निकटवर्तीयां कडून मिळाली आह.

## प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल विले पार्ले चा जिम्नॅस्ट आध्यान देसाई याची भारतीय संघात निवड

**वादळवार्ता/मुंबई**

मुंबईचे माजी महापौर माजी आमदार डॉ. रमेश यशवंत प्रभू यांनी १९९७ साली प्रबोधकार ठाकरे क्रीडा संकुलाची स्थापना केली तेव्हा त्यांच्या मनात एक मोठे स्वप्न होते. त्यांना जागतिक दर्जाच्या आणि सर्वांसाठी खुल्या अशा पायाभूत सुविधा निर्माण करायच्या होत्या. गेल्या काही वर्षांमध्ये, प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाने खेळाडूंसाठी जागतिक दर्जाचे इक्विपमेंटस् प्रदान केली आहे. यातील अनेक खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर आपल्या खेळात ठसा उमटवला आहे. संकुलात खालील निरनिराळ्या क्रिडा प्रकारच्या खेळांचे प्रशिक्षण तज्ञ प्रशिक्षकांडून दिले जात आहे. जलतरण, पिकलबॉल, मल्लखांब, बुद्धिबळ, ज्युडो, जिम्नॅस्टिक्स, कराटे, तायकोंडो, व्यायामशाळा, रोलर स्केटिंग, टेबल टेनिस, झुंबा, रायफल शुटिंग ईत्यादी. प्रबोधकार ठाकरे क्रीडा संकुलाच्या ७ हून अधिक खेळाडूंनी विविध खेळांमध्ये सर्वात प्रतिष्ठित शिवछत्रपती पुरस्कार जिंकला आहे. मल्लखांब खेळातील अतुलनीय कामगिरीबद्दल श्री गणेश देवरूखकर यांना यावर्षी द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अगदी अलीकडेच, जिम्नॅस्टिक्स ॲथलीट आध्यान देसाईची आगामी ज्युनियर एशियन ट्रॅम्पोलिन जिम्नॅस्टिक्स





चॅम्पियनशिप २०२४ साठी हॉंगकॉंग, चीन येथे टीम इंडियाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा मे महिन्यात होणार असून १० ते १२ मे २०२४ या कालावधीत होणार आहे. आध्यान हा माजी अंडर-१२ राष्ट्रीय चॅम्पियन देखील आहे आणि त्याने कोलकाता येथे नुकत्याच संपलेल्या सब ज्युनियर नॅशनल स्पर्धेत अनेक पदकेही जिंकली आहेत. हरियाणा येथील खेलो इंडियन युथ गेम्स २०२२ मध्येही त्याने भाग घेतला होता आणि सरकारी मंजूर योजनेअंतर्गत तो एक खेलो इंडिया ॲथलीट आहे. आध्यान गेल्या १० वर्षांपासून प्रबोधकार ठाकरे क्रीडा संकुल मध्ये सराव करत आहे. त्यांचे प्रशिक्षक श्री शुभम गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अध्यक्ष श्री. अरविंद रमेश प्रभू आणि सचिव श्री मोहन अ. राणे यांच्या पाठिंब्याने ही अतुलनीय कामगिरी केली आहे. अध्यक्ष श्री. अरविंद रमेश प्रभू आणि सचिव मोहन अ. राणे यांनी ही बातमी मिळाल्याने आनंद व्यक्त केला आणि आशियाई स्पर्धेसाठी आध्यानला शुभेच्छा दिल्या.

## खारवडे येथील म्हसोबा देवाची यात्रा उत्साहात संपन्न

**दैनिक वादळवार्ता पुणे/चैताली औटे**

पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील खारवडे गावातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र म्हसोबा देवस्थान ट्रस्ट श्री म्हसोबा देवाची यात्रा दर वर्षी चैत्र शुद्ध पौर्णिमा म्हणजे हनुमान जयंती आधिच्या दिवशी पासुन हा उत्सवाला प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी मंदिराच्या परिसरात दिपोत्सव करुन भजनाचा कार्यक्रम आणि अभिनव गंधर्व पंडित रघुनाथ खंडाळकर गुरुजी आणि शुभम खंडाळर यांचा शिष्यवृंद यांचा संतवाणी कार्यक्रम झाला. दुसरा दिवस म्हणजे पहाटे पाच वाजल्यापासून हा सोहळा चालू झाला .त्यामध्ये देवाला आंघोळ घालून रुद्राभिषेक



केला, १०० तोळ्याचा सुवर्ण मुकुट अर्पण केलागेला ,होम हवन, तालुक्यात नावलौकिक करणाऱ्या मान्यवरांचे सत्कार, पुरस्कार वितरण ,प्रवचन, संध्याकाळी चार वाजता ढोल-ताशांच्या गजरात पालखी सोहळा, स्तिर वादन आणि सायंकाळी छबिना काढण्यात आला. छबीना आणि पालखीला ध्वज पतका काठी नाचवली जाते आणि छबीन्याच्या वेळी आतिष बाजी करण्यात आली. आकर्षक बक्षीस देऊन ढोल लेझीम स्पर्धा आणि रात्री तमाशा लोकनाट्य कला अशा पद्धतीने कार्यक्रम आयोजित केले.तसेच रात्री बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे आणि माजी खासदार नानासाहेब नवले यांनी म्हसोबा देवाचे दर्शन घेतले.

# राज्यात सरकार आल्यास ऊसतोड महामंडळाचा अध्यक्ष हा बंजारा समाजाचा असेल-बजरंग सोनवणे

## गेवराईच्या मेळाव्यात बंजारा समाजाचा बजरंग सोनवणे यांना पाठिंबा

**वादळवार्ता/गेवराई**

आम्ही बंजारा समाजाच्या सदैव पाठीशी आहोत. राज्यात इंडिया आघाडीचे सरकार आल्यास ऊसतोड महामंडळाचे अध्यक्षपद देखील बंजारा समाजाच्या व्यक्तीला देवू. तसेच जिल्हा परिषद, पंचायत समितीध्ये बंजारा समाजाला प्रतिनिधित्व देवून त्यांचा सन्मान राखला जाईल. असे आश्वासन बजरंग सोनवणे यांनी दिले.



गेवराई शहरातील बेदरे लॉन्स येथे बंजारा समाजाचा राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना जाहीर पाठिंबा देण्यासाठी महानायक ग्रुपच्या वतीने संस्थापक अध्यक्ष भगवान राठोड यांनी बंजारा समाजाच्या वतीने मेळावा आयोजित करून शक्ती प्रदर्शन केले. यावेळी उमेदवार बजरंग सोनवणे हे बोलत होते. मेळाव्यास युवा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष महबूब शेख, माजी आमदार बदामराव पंडित, पक्षाचे जिल्हाध्यक्ष आमदार संदीप शिरसागर, युवा नेते युद्धजीत पंडित, राष्ट्रवादी किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पूजा मोरे, उद्योजक पानसंबळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

या मेळाव्यात बंजारा समाजाच्या कार्यकर्त्यांनी भाजप सरकार व त्यांच्या नेत्यांचा धडा शिकवायचा असेल तर या लोकसभेच्या निवडणुकीत भाजप उमेदवाराचा पराभव करणे आवश्यक आहे. बंजारा समाज हा सेवालाल महाराज आणि स्व. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या विचाराचे पाईक असून ते आमच्या समाजाचे आदर्श आहेत असे सांगितले.

मेळाव्यास महानायक ग्रुपचे भगवान राठोड आणि त्यांचे संस्थापक भगवान राठोड आणि त्यांचे सहकारी जायकोबा राठोड, शरद पवार, संजय पवार सुनील चव्हाण यांच्यासह गेवराई आणि माजलगाव तालुक्यातील बंजारा बांधव व तरुण उपस्थित होते. दरम्यान, बंजारा समाजाचा बजरंग बप्पा सोनवणे यांना पाठिंबा दिला असल्याने भाजप आणि त्यांच्या उमेदवाराच्या पायाखालची वाळू सरकली आहे.

### बंजारा समाजाचे आरक्षण हिसकवून घेणाऱ्यांना धडा शिकवा

आमचा समाज मागीसि असताना भाजप नेत्यांनी सत्तेचा गैरवापर करून आमच्या जात प्रवर्गात इतर समाजाचा समावेश करून आमचे अधिकार आणि हक्क हिरावले आहेत. त्यामुळे आमच्या समाजावर अन्याय झालेला असून बंजारा समाज मागे पडत असल्याचे दिसत आहे. हा समाज ऊसतोड मजूर असून स्थानिक स्वराज्य संस्थेत प्रतिनिधित्व मिळत नाही. तसेच बंजारा समाज ऊसतोड करणारा आहे. तरी देखील ऊसतोड महामंडळाचा अध्यक्ष इतर समाजाचा करून अन्याय केला जात आहे. अन्यायाचा बदला घेण्यासाठी आता भाजपची सत्ता उलथून टाकण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस - शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना बंजारा समाजाचा पाठींबा देण्याचा एकमुखी निर्णय घेतला आहे. असे महानायक ग्रुपचे संस्थापक भगवान राठोड यांनी सांगितले.

# खालापूरी गावात तत्काळ टँकर चालू करा नसता पाण्यासाठी संघर्ष करु-डॉ.जितीन वंजारे

**(खालापुरी / प्रतिनिधी)**

खालापूरी गावात टँकर चालू न केल्यास तत्काळ कारवाई केली जाईल जनसामान्यांचा प्रचंड जमाव घेऊन ग्रामपंचायत वर मोर्चा काढणार असून पाण्यात होणारा भ्रष्टाचार उघड केला जाईल,शासनाचा निर्णय अंमलात न आणणाऱ्या वर गावकरी आणि नागरिकांनी अविश्वास का आणू नये अशी याचिकाही दाखल केली जाणार आहे. त्यामुळे अगदी पाच दिवसात खालापुरी येथे पाण्याचे टँकर चालू केले गेले नाही तर कायदेशीर कार्यवाही खालापूरी ग्रामपंचायत वर केली जाईल.आजूबाजूच्या गावात टँकर चालू होतात मग खालापूरी येथे का होत नाहीत? आपला माणूस कुठे कमी पडतोय ? ह्याचा जबाब विचारण्यासाठी आख्ख गाव घेऊन हंडा मोर्चा काढला जाणार आहे तरी ग्रामपंचायत ला पाच दिवसाचा वेळ देत असून तितक्या दिवसात काम नाही झाल्यास मा.तहसील कार्यालय शिरूर कासार आणि खालापूरी ग्रामपंचायत वर महिला बाल वृद्ध घेऊन हंडा मोर्चा काढला जाणार आहे. हा पाण्यासाठी रणसंग्राम असून मूलभूत गरजा पूर्ण करता येत नसेल तर आपापली जागा सोडा असा इशाराही यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ जितीन दादा वंजारे खालापूरीकर यांनी दिला आहे.पाण्यासारखी पुण्याची महत्त्वाची गोष्ट गावाला देता येत नसेल तर तुम्ही दुसरं काय देणार ? गावातील गरीब नागरिक पाण्यासाठी पैसे मोजत आहेत ,रोज शंभर रुपये पाण्याला खर्च करत आहेत ही अपमानास्पद गोष्ट आहे आतापर्यंत अशी गोष्ट घडली नव्हती कोव्हीड सारख्या महामारीतही गाव चांगला सांभाळला होता पण आज त्यापेक्षा ही बिकट संकट गावावर असताना येथील नेते शेपूट घालून गप्प आहेत,अरे राजकारण सोडा,गावातील हनुमान महाराज सप्ताह आणि यात्रेत खादीचे पांढरे कपडे घालून हिंडणाऱ्या स्वयंघोषित नेत्यांनी स्वतच्या बायकोला आईला बहिणीला विचारा घरात पाणी नसल्यावर काय होते आणि ते जर आपली ग्रामपंचायत देत नसेल तर तिचं करायचं काय? आपले हक्क आणि अधिकार गुलाम ठेऊन पांढरे कपडे घालू नका ती सोन्याच्या साखळदंडातली गुलामी आहे लक्षात असू द्या.कमीत कमी बायकांसाठी,घरच्यांसाठी तरी रस्त्यावर या.घरातील गावाच्या सर्वांगीण विकासावर लक्ष द्या,शिक्षण,आरोग्य,मूलभूत सुविधा यावर ग्रामपंचायत ने लक्ष देणं गरजेचं आहे ते जर होत नसेल तर संघर्ष आपण करणार असा इशारा यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ.जितीन वंजारे यांनी दिला. गावात पाणी नाही काही हरामखोरांनी योजनाच्या योजना खाल्ल्या पाण्याचा टिपूस येऊ दिला नाही तरीही आपण गप्प , पाइपलाइन उकरून खाल्ली भ्रष्टाचार केला तरीही आपण गप्प कुठवर गप्प राहणार आहात गावाला जोपर्यंत पाणी येत नाही तोपर्यंत संघर्ष चालूच ठेवणार ,आता जागे व्हा सगळे एकत्र या पाण्याचा संगर पार



पाडू गावाला शुद्ध पाणी आलेच पाहिजे. लोकांना राजकारण करुद्या मी सामाजिक कार्यकर्ता मा.सम्राट डॉ जितीनदादा वंजारे खालापूरीकर तुमच्या साठी कायम रस्त्यावर उतरून संघर्ष करेल गावाला पाणीच मिळवून देऊ असा विश्वास देतो.........!

## गाव उजळवणारे सौर ऊर्जेचे खांब अंधारात; गाव पुढा-यांच्या खिशात पैशाचा प्रकाश :- डॉ.गणेश ढवळे

**वादळ वार्ता | बीड**

ग्रामीण भागातील अंधार दुर करण्यासाठी बहुतांश गावात सौरऊर्जेवर चालणारे खांबावरील सौरऊर्जेची प्लेट, बल्ब,बटरी आणि उभे केलेले खांब मात्र अंधारात खितपत पडलेल्या अवस्थेत आहेत.आमदार फंडातील २५-१५ आणि ग्रामपंचायत अंतर्गत १५ व्या वित्त आयोगातुन सौरऊर्जा खांबासाठी खर्च करण्यात आलेला लाखो रूपयांच्या पैसातुन मात्र गाव अंधारात असतानाही गावपुढा-यांचे खिसे प्रकाशमय झालेले दिसुन येत आहेत.त्यामुळे शासनाने गांभीर्याने सौर ऊर्जा खांबाची पहाणी करून सौर ऊर्जा पुर्ववत सुरू करावी आणि गावपुढा-यांनी गैरव्यवहार केलेला असेल तर आवश्यक कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

गावपुढा-यांचा मनमानी कारभार ; घरावर तर जनावरांच्या गोठ्यावर सौरऊर्जेचे खांब गावातील सार्वजनिक प्रार्थना स्थळे, मुख्य चौक, प्रमुख रस्ते,गावची वेस, स्मशानभूमी, हातपंप,आदी ठिकाणी ग्रामस्थांना अंधा-या रात्रीत सुद्धा लख्ख प्रकाश असावा म्हणून लावण्यात येणारे सौरऊर्जेचे खांब गावपुढा-यांनी



मनमानी कारभार करत स्वतःच्या अथवा मर्जीतील कार्यकर्ते यांच्या घरावर तर काही महाभागांनी स्वतःच्या शेतातील जनावरांच्या गोठ्यांवर लावलेले आढळुन येत आहेत.

नादुरुस्त सौरऊर्जा खांबाकडे सरपंच,ग्रामसेवकांचे दुर्लक्ष सौरऊर्जा बल्ब खाबांकडे ग्रामपंचायत कार्यालय व ग्रामस्थांचे दुर्लक्ष झाल्याने.सौर ऊर्जेचे उभे केलेले खांब काही महिन्यातच बंद पडल्यानंतर त्याची वेळेवर गॅरंटी कालावधीत दुरुस्ती करणे आवश्यक असताना सरपंच,ग्रामसेवक याकडे दुर्लक्ष करत असल्याने अखेर अडगळीत पडलेल्या खांबावर नादुरुस्त असलेल्या सौर ऊर्जेच्या प्लेट,बल्ब, बॅटऱ्या भुरट्या चोरांनी पळवल्याच्या घटना ब-याच ठिकाणी पहायला मिळतात. त्यामुळे वेळेवर नादुरुस्त बट-या जबाबदार सरपंच व ग्रामसेवकांनी वेळेवर दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

## अलबत्या गलबत्याफया प्रसिद्ध मराठी नाटकाला जनतेचा उत्तम प्रतिसाद.




**दैनिक वादळ वार्ता**
**उरण /विठ्ठल ममताबादे**

ओएनजीसी उरण प्लांटने जेएनपीटी आणि एनजीओ सिटिझन्स असोसिएशन फॉर चाइल्ड राईट्स यांच्या संयुक्त विद्यमाने उरणच्या जवळपासच्या गावातील मुलांसाठी 'अलबत्या गलबत्या' हा प्रसिद्ध मराठी नाटकाचा कार्यक्रम आयोजित केला होता. सुभोजित बोस ईडी-प्लांट मॅनेजर उरण, अशोक बाबू, सीजीएम- सपोर्ट मॅनेजर, श्रीमती भावना आठवले, जीएम-इन्चार्ज एचआर-ईआर, स्थानिक संस्था, शाळांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत ओएनजीसी गेटपासून जेएनपीटी सभागृहाकडे जाणाऱ्या बसेसना हिरवा झेंडा दाखवला. या उपक्रमाचे ग्रामस्थ, मुले, शिक्षक व पालकांनी भरभरून कौतुक केले. नाटकातील कलाकारांचेही शेवटी उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले आणि सर्वांनी उत्साहाने शाळकरी मुलांसोबत फोटोशूटमध्ये सहभाग घेतला. ओएनजीसी बऱ्याच काळापासून शालेय मुलांसाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन करत आहे जे स्थानिक समुदायाशी भावनिक बंध मजबूत करण्यास मदत करतात.

# जिल्ह्याचा विकास, रोजगार निर्मितीचे प्रकल्प आणले असते, तर मतांची भीक मागण्याची वेळ आली नसती

## बजरंग बप्पा सोनवणेंची भाजप, पालकमंत्र्यांवर टीका

**वादळवार्ता/बीड**

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री, विद्यमान खासदार व त्यांच्या भाजपच्या उमेदवाराने जिल्ह्यात कोणत्याही विकासाच्या योजना राबविल्या नाहीत. रोजगार निर्मितीसाठी नवीन प्रकल्प आणले नाहीत. सिंचन आणि इतर सोयी सुविधा यांच्याकडे दुर्लक्ष केल्याने आज त्यांच्यावर मतांची भीक मागण्याची वेळ आली आहे. अशी खरमरीत टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी करीत त्यांनी मी जिल्ह्यातील मतदारांचा स्वाभिमान जपल्यामुळे मी सन्मानाने लोकशाहीत मतांचे दान मागत असल्याचे सांगितले.

शिरूर कासार तालुक्यात प्रचारादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे बोलत होते. यावेळी युवा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख यांच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्ष, राष्ट्रीय काँग्रेस, शेतकरी कामगार पक्ष यासह इंडिया आघाडीतील मित्र पक्षाचे स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्र्यांनी मी भाजप, महायुतीच्या उमेदवारासाठी व माझ्या ताईसाठी मतदानाची भीक मागतोय. असे वक्तव्य एका सभेतून केले होते. त्या वक्तव्याचा बजरंग सोनवणे यांनी समाचार घेताना म्हटले की, जर त्यांनी बीड जिल्ह्याचा विकास केला असता रोजगार निर्मितीचे विविध प्रकल्प आणून जिल्ह्यातील बेरोजगारी कमी केली असती. तर त्यांना मतांची भीक मागण्याची वेळ आली नसती. मी मात्र स्वाभिमानाने व सन्मानाने मतदानाचे दान मागतो. हा त्यांच्यात आणि माझ्यात फरक आहे. असे सांगून स्वतःला राष्ट्रीय नेते म्हणणाऱ्या भाजप नेत्यांनी माझ्या सारख्या शेतकरी पूत्रावर बोलणे म्हणजे त्यांची उंची कमी झाल्याचे लक्षण आहे. माझी औकात व लायकी काढणे म्हणजेच हे सामान्य लोकांना हिणविण्याचा प्रकार आहे.




मी १९९२ पासून स्थानिक राजकारणात प्रवेश केला. तर पालकमंत्री व त्यांच्या भगिनी या २००९ पासून राजकारणात सक्रिय झाल्या. म्हणजेच माझा राजकीय अनुभव त्यांच्यापेक्षा जास्त आहे. तसेच मराठा, धनगर व मुस्लिम आरक्षणात प्रत्येक वेळी मी सोबत राहिलो आहे. माझ्या घरात राजकीय वारसा नसेल. मी त्यांच्या सारखा श्रीमंत नसेल परंतु माझी नैतिक उंची त्यांच्यापेक्षा जास्त आहे. असल्याचे सांगितले. तर रेल्वे प्रश्नावर बोलताना बजरंग सोनवणे म्हणाले की, मी माझ्या काळात रेल्वे परळीपर्यंत आणील, दुसऱ्या टर्मला उमेदवारी अर्ज भरायला रेल्वेने येईन अशी ग्वाही देत मी जिल्ह्यातील जनतेच्या आशीर्वादाने इतिहास घडविणार असल्याचा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )